# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग, मुख्यालय

दि.०९/११/२०२२

## <u>जाहीर सूचना</u>

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महानगरपालिका क्षेत्रात ज्या नागरिकांना नवीन नळजोडणी आवश्यक आहे अशा नागरिकांनी अर्जासोबत अथवा यापूर्वी सादर केलेल्या अर्जासोबत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा चालू व थकीत मालमत्ता कराचा १००% भरणा महानगरपालिकेकडे करून त्याच्या पावतीची छायांकित प्रत सादर करावी. तसेच ज्या नागरिकांकडे यापूर्वी नळजोडणी आहे व अतिरिक्त नळजोडणी मंजुरी करिता अर्ज सादर केला आहे अशा नागरिकांनी देखील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा चालू व थकीत मालमत्ता व पाणीपट्टी कराचा १०० % भरणा महानगरपालिकेकडे करून पावतीची छायांकित प्रत संबंधित पाणीपुरवठा कार्यालयाकडे सादर करावी.

वरील प्रमाणे मालमत्ता व पाणीपट्टी कर थकीत रक्कमेसह १००% भरणा करण्यासह अन्य आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर प्रभाग निहाय तसेच रक्कम भरलेचे दिनांक निहाय प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सूर्या टप्पा-(II) च्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून १८५ द.ल.ली.पाणी उपलब्ध होणार आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर प्रतिक्षा यादीनुसार नवीन नळजोडण्या मंजुरीस व प्रत्यक्ष जोडणीस प्राधान्य देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदरची योजना १५ मार्च, २०२३ पावेतो कार्यान्वित राहील.

पाणीपुरवठा विभाग, मुख्यालय
वसई विरार शहर महानगरपालिका